# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

MUHS

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik422004

Tel : (0253) 2539151, 2539158

Website : www.muhs.ac.in, E-mail : administration@muhs.ac.in

**डॉ. कालिदास द. चव्हाण**
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
**कुलसचिव**

**Dr. Kalidas D. Chavan**
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
**Registrar**


जा.क्र.मआविवि/अे- ३६८ /२०१९ दिनांक:-२०/०५/२०१९

**By-E-Mail**

**परिपत्रक**

प्रति,

मा. अधिष्ठाता /प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये / परिसंस्था,
म.आ.वि.वि.नाशिक.

विषय : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा करणेबाबत.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, दि. १० जून १९९८ रोजी विद्यापीठाची स्थापना झाली असल्याचे आपणा सर्वांना ज्ञात आहे. यास्तव विद्यापीठातर्फे दरवर्षी दि. १० जून हा दिवस विद्यापीठ स्थापना दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

उक्त बाब विचारात घेता दि.१० जून हा दिवस विद्यापीठ वर्धापनदिन (**Foundation Day**) म्हणून दि. १०/०६/२०१९ (सोमवार) रोजी महाविद्यालयामध्ये साजरा करण्यात यावा. विद्यापीठाकडून आपणास विद्यापीठ ध्वज यापुर्वीच पाठविण्यात आलेला आहे. सदर दिवशी आपल्या महाविद्यालयात सकाळी १०.०० वाजता विद्यापीठ ध्वजाचे आरोहन करण्यात येऊन विद्यापीठ गीत वाजविण्यात यावे. तसेच विद्यापीठ ध्वज सुर्यास्तापर्यंत ठेवण्यात यावा. सदर दिवशी महाविद्यालयीन स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

सदरचे परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला

कुलसचिव

प्रत :

१) मा. कुलगुरु कार्यालय
२) मा. प्रति-कुलगुरु कार्यालय
३) कुलसचिव कार्यालय